# समग्र शिक्षा , शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहमदनगर

## शिक्षकांचे ओळखपत्र प्राथमिक व माध्यमिक

**उद्देश -** शालेय शिक्षणाच्या क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी भारत सरकारने कार्यक्षमता प्रतवारी दर्शके(Performance Grading Index) ची रचना केली आहे.यामुळे प्रत्येक शालेय शिक्षण प्रणाली मजबूत असणे आवश्यक आहे.राज्य कार्यक्षमता प्रतवारी दर्शकांमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत आहे.महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचे दि.२५.१०.२०१९ यांचे पत्रानुसार समग्र शिक्षा अंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत सन २०१९-२० या वर्षी राज्यातील इ.१ ली ते ८ वी च्या शासकीय व अनुदानित शाळांमधील शिक्षकांसाठी उपक्रम राबविण्यात येत आहे.Teacher ID Cards या उपक्रमाकरिता यू-डायस प्लस २०१८-१९ नुसार इ.१ ली ते १२ वी च्या शासकीय , स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा व अनुदानित शाळांमधील शिक्षकांना रु.५०/- प्रमाणे तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

**मार्गदर्शक सूचना**

१. शिक्षकांच्या ओळखपत्रावर महाराष्ट्र शासन शब्द अथवा शासनाचा लोगो वापरु नये.
२. अनुदानित शाळा असल्यास शासन अनुदानित शाळा एवढाच उल्लेख करण्यात यावा.
३. इयत्ता १ ली ते ८ वी च्या शासकीय शाळा,स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा व १०० % अनुदानित शाळांमधील शिक्षकांसाठी ओळखपत्र द्यावयाचे आहे.अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षकांसाठी ओळखपत्र मंजूर नाही.
४. जिल्ह्यातील उपरोक्त सर्व शिक्षकांचे ओळखपत्र जिल्हा / तालुका स्तरावरुन तयार करुन घेण्यात यावे.तसेच याबाबतचा खर्च सुध्दा जिल्हा / तालुका स्तरावरुन करावा.
५. प्रती ओळखपत्र रु.५०/-(सर्व खर्चासह)च्या वर खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.मंजूर तरतूदीपेक्षा जादा झालेला खर्च मान्य केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
६. विहीत योग्य पध्दतीचा अवलंब करुन ओळखपत्र तयार करण्यासाठी पुरवठादार निश्चित करावा.

७. संपूर्ण जिल्ह्यामध्ये समानता राहण्यासाठी ओळखपत्राची साईज ८.५ से.मी लांबी X ५.५ से.मी. रुंदी अशी असावी.

८. उपरोक्त आशयानुसार शिक्षकांचे ओळखपत्र तयार करण्यात यावे.यामधील कोणतीही माहिती वगळू नये.

९. ओळखपत्रावरील शिक्षकांची माहीती अंतिम प्रिंट करण्यागोदर संबंधित शिक्षकांकडून तपासणी करुन घ्यावी व ती अचूक असल्याची खात्री व तद्नंतरच अंतिम छपाई करावी.

१०. ओळखपत्रावरील माहीती चुकीची आढळून आल्यास,त्या शिक्षकांना दुसरे ओळखपत्र छपाई करुन द्यावे याकरिता पुरवठादारास कोणताही अतिरिक्त निधी देण्यात येऊ नये.

११. ओळखपत्र छपाई व वितरणाचे कामकाज सन २०१९-२० याच आर्थिक वर्षात पूर्ण करुन घ्यावे.

१२. शिक्षकांना ओळखपत्र वितरण केल्यानंतर,मंजूर तरतूदीमधील रक्कम शिल्लक राहात असल्यास सदर शिल्लक रक्कम भरणा तात्काळ करण्यात यावा.